**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०१ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वेव्हज् हे फक्त एका परिषदेचं संक्षिप्त नाव नसून खरोखर एक सांस्कृतिकता, सर्जनशीलतेची, जागतिक स्तरावर परस्परसंबंधांची लाट असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच वेव्हज् या जागतिक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मुंबईत प्रतिपादन.**
2. **महाराष्ट्र दिन सर्वत्र उत्साहात साजरा, नागपुरात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाल ध्वजवंदन.**
3. **मुख्यमंत्री फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत नागपूर विभागाची सर्वोत्तम कामगिरी.**
4. **आज आणि उद्या नागपूरसह पूर्व विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.**

---------------------------------------

**वेव्हज् परिषद**

**वेव्हज् हा फक्त एका परिषदेचं संक्षिप्त नाव नाही तर, खरोखर एक सांस्कृतिकतेची, सर्जनशीलतेची, जागतिक स्तरावर परस्पर संबंधांची लाट आहे असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत जिओ वर्ल्ड कन्वेन्शन सेंटर इथं सुरू असलेल्या वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.**

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 37 सेकंद)***

***वर्ल्ड ऑडियो विजुअल एंड एंटरटेनमेंट समिट यानी वेव्हज ये सिर्फ एक्रोनिम नहीं है, ये वाकई एक वेव्ह है कल्चर की, क्रिएटिविटी की, यूनिवर्सल कनेक्ट की और इस वेव्ह पर सवार हैं फिल्मे, म्यूजिक, गेमिंग, ॲनिमेशन, स्टोरीटेलिंग, क्रिएटिविटी का अथाह संसार वेव्ह एक ऐसा ग्लोबल प्लेटफॉर्म है।***

**वेव्हज् हा एक जागतिक मंच असून, जो तुमच्या सारख्या प्रत्येक कलाकाराचां आहे. त्यामुळे प्रत्येक कलावंत सर्जनशीलतेच्या जगाशी जोडला जाईल असंही ते यावेळी म्हणाले. यावेळी मोदी यांनी, ३२ विविध स्पर्धांमधून अंतिम फेरीत**

पोहोचलेल्या ८०० स्पर्धकांचं अभिनंदनही केलं. प्रथमच भरणाऱ्या या परिषदेला, परराष्ट्र मंत्री, एस.जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री, अश्विनी वैष्णव, राज्यपाल, सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह, अनेक मान्यवर उपस्थित होते. वेव्हज् परिषदेमुळे देशातल्या आशय निर्मात्यांना जगभरातल्या गुंतवणूकदारांशी संपर्क निर्माण करण्याची संधी मिळत आहे असं, माहिती प्रसारण मंत्री, अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

*(होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव -15 सेकंद)*

*Waves is meant to offer a platform for creators from around the world. It will provide exposure to new technologies. It will connect creators with investors, producers and buyers. This will create new economic opportunities.*

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की ५०० एकर क्षेत्रफळ असलेली मुंबईतील चित्रपट नगरी आता, पुढील पिढीच्या स्टुडिओ इको-सिस्टमसाठी जागतिक केंद्र म्हणून विकसित केली जात आहे. यातील १२० एकरमध्ये माध्यम आणि करमणूक शहर उभारण्यात येऊन यात, ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि गेमिंगवर लक्ष केंद्रित करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. वेव्हज ही केवळ एक परिषद नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली एक चळवळ असल्याची प्रतिक्रिया अभिनेता शाहरुख यांनी दिली आहे. या परिषदेला चित्रपटसृष्टीतून शाहरुख खान, रजनीकांत, अक्षय कुमार, विकी कौशल, आमीर खान, आलिया भट, रणबीर कपूर, अनिल कपूर, अनुपम खेर यांच्यासह, मनोरंजन क्षेत्रातले अन्य मान्यवर उपस्थित होते. मुंबईत आजपासून ते येत्या चार मे पर्यंत ही परिषद चालणार आहे.

---

महाराष्ट्र दिन

महाराष्ट्र दिन आज साजरा होत आहे. एक मे १९६० रोजी भाषिक प्रांत रचनेनंतर, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली होती. कामगार दिनही आज साजरा होत आहे. मुंबई इथं दादर परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर राज्यपाल, सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झालं. राज्य स्थापना दिना निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मुंबईतील हुतात्मा स्मारकावर अभिवादन केल्यानंतर जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री 40 सेकंद)*

*महाराष्ट्र दिन हा याकरता महत्त्वाच आहे.या भारतातला सर्वात पुरोगामी आणि प्रगतशील राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जातं छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणारा हा महाराष्ट्र निरंतर भारताच्या विकासामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका पार पडतो आहे. याच महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी करण्याचा आमचा संकल्प आहे. शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहचवुन सर्वांना सोबत घेऊन विकसित महाराष्ट्र घडवायचा असा एक निर्धार आणि निश्चय आज या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आम्ही करतोय.*

दरम्यान मुंबई इथं होत असलेल्या जागतिक दृक श्राव्य परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून राज्यातील जनतेला महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

*(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 12 सेकंद)*

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या या भूमीतील सर्व बंधू भगिनींना महाराष्ट्र दिनाचा खूप खूप शुभेच्छा.*

महाराष्ट्र दिनाचा मुख्य शासकीय समारंभ, नागपूरच्या कस्तुरचंद इथं संपन्न झाला यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं. भक्कम पायाभूत सुविधांमध्ये आणखी नियोजन बध्द भर टाकून, येत्या पाच वर्षात, नागपूरला आंतरराष्ट्रीय महानगराचा लौकीक प्राप्त करुन देऊ असा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. बावनकुळे यांच्या हस्ते जिल्हयातील 11 नगर परिषदांना अग्नीशमन वाहनांचं वितरण करण्यात आलं. विदर्भाच्या विविध जिल्हयात पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वज वंदन पार पडलं. बुलडाणा शहरात पालकमंत्री तथा राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री, मकरंद पाटील, गोंदिया इथं पालकमंत्री बाबासाहेब पाटील, यवतमाळ मध्ये पालकमंत्री, संजय राठोड, वाशिम जिल्हयात पालकमंत्री, दत्तात्रय भरणे, चंद्रपूर इथं पालकमंत्री, डॉ.अशोक उईके, अकोला इथं पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर, गडचिरोली इथं राज्याचे वित्त आणि नियोजन राज्यमंत्री तथा जिल्हयाचे सह-पालकमंत्री आशिष जयस्वाल, वर्धा इथं पालकमंत्री पंकज भोयर, अमरावती इथं विभागीय आयुक्त, श्वेता सिंघल यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. दरम्यान, यवतमाळच्या शासकीय रुग्णालयात महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून शिवसेनेनं महारक्तदान शिबिराचं आयोजन केलं.

पालकमंत्री संजय राठोड ह्यांनी, या शिबिराचं उद्धाटन केलं. या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येनं शिवसैनिकांनी रक्तदान केलं.

-----------------------------------------

विदर्भ राज्य आंदोलन समिती

महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर आज नागपुरात, विदर्भ राज्य आंदोलन समिती आणि जय विदर्भ पक्षाचे कार्यकर्ते, काळे कपडे घालून रस्त्यावर उतरले. व्हेरायटी चौकात काळा दिवस पाळून विदर्भ समर्थकांनी महाराष्ट्र सरकारचा निषेध केला. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीच्या निषेधार्थ, विदर्भानं काळा दिवस पाळला असल्याचं विदर्भ वादींनी सांगितलं. जय विदर्भ पक्षाचे कार्यकर्ते, रस्त्यावर उतरताच निदर्शने करत असताना पोलिसांनी त्यांना अटक केली.

-----------------------------------------

सुधारणा कार्यक्रमाचा निकाल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यातील शासकीय कार्यालयांना शिस्त लावणे, नागरिकांची कामं जलदगतीनं पूर्ण होणे आणि शासन प्रशासन आणि नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होणे या उद्देशानं, १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचं मूल्यमापन आज जाहीर करण्यात आलं. यामध्ये महिला आणि बालविकास विभाग सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग ठरला आहे. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत, नागपूर विभागानं, सरस कामगिरी केली असून, विभागातील पाच कार्यालये सर्वोत्तम ठरली आहेत. चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा हे राज्यातून पहिले तर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. नागपूर पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि गोंदिया पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी अनुक्रमे तिसरा आणि चौथा क्रमांक पटकाविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विजेत्या अधिकाऱ्यांचं अभिनंदन केलं असून, त्यांनी म्हटलं आहे की गुणवत्ता मोहिम एक सुरूवात आहे. भविष्यातील महाराष्ट्राच्या प्रशासनासाठी ही एक आदर्श कार्यपद्धती ठरेल.

-----------------------------------------

हवामान

विदर्भातील नागपूरसह पूर्व विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आणि पश्चिम विदर्भातील अकोला आणि यवतमाळ इथं आज आणि उद्या तुरळक ठिकाणी

मेघ गर्जनेसह वादळी वारा आणि अत्यंत हलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होऊ शकते असा इशारा, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागांनं वर्तवला असून, आगामी 48 तासात हवामानात काही अंशानं कमाल तापमानात घट होऊ शकते असं देखील वर्तवण्यात आला आहे. दरम्यान पश्चिम विदर्भातील अमरावती, बुलढाणा, वाशिम जिल्ह्यामध्ये आज हवामान सामान्य राहणार आहे. दरम्यान येत्या काही तासात विदर्भातील नागपूर आणि भंडारा जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी वारे, गारपीट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान आज विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला जिल्ह्यात 45 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं तर नागपुरात 41.6 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली.

----------------------------------------

आयपीएल

आय.पी.एल. क्रिकेट स्पर्धेत आज, मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स हा सामना जयपूरच्या, सवाई मानसिंग स्टेडीयमवर रंगणार आहे. खेळ सायंकाळी साडेसात वाजता सुरु होईल. कालच्या सामन्यात, चेन्नई सुपर किंग्ज संघाचा, पंजाब किंग्ज इलेव्हन संघानं पराभव केला. चेन्नईच्या या पराभवामुळे, चेन्नईचा संघ स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला आहे.

----------------------------------------